# 7 डिसेंबर

## आजचा सुविचार :

"दुर्बल लोक सूड घेतात, सामर्थ्यवान लोक क्षमा करतात, हुशार लोक दुर्लक्ष करतात."

## आजचे पंचांग :

वार – मंगळवार
दिनांक: 7 डिसेंबर 2021

तिथी – मार्गशीर्ष
नक्षत्र – उत्तराषाढ

सूर्योदय – सकाळी 7.01 वाजता
सूर्यास्त – सायंकाळी 5. 59 वाजता

## आजचे दिनविशेष :

- 1949 ला भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिवस साजरा करण्यास सुरुवात झाली.
- 1995 ला भारताने इनसेट-2 सी उपग्रहाचे प्रक्षेपण केले.
- 2008 ला भारतीय गोल्फ खेळाडू जीव मिल्खा सिंह यांनी जपान दौरा खिताब जिंकला.
- 1879 ला भारताचे क्रांतिकारक जतीन्द्रनाथ मुखर्जी यांचा जन्म.

## आजचे इंग्लिश शब्द :

1) Hut – झोपडी
2) House - घर
3) Building – इमारत
4) Temple – मंदिर

## आजची प्रश्नमंजुषा :

1) बाल दिन कधी साजरा केला जातो?
2) सूर्यमालेतील सर्वात लहान ग्रह कोणता?
3) तुम्हाला माहित असलेल्या कोणत्याही एका सरकारी बँकेचे नाव सांगा.
4) 50 पुस्तके 5 जणांमध्ये वाटल्यास प्रत्येकाला किती मिळतील?
5) हवेतील घटक कोणते?

## बोधकथा :

### रानटी व गावठी हंस

एका कुंपणात काही हंस पाळले होते. त्यापैकी दोन हंस एके दिवशी कुंपणाच्या फटीतून बाहेर पडले व जवळच एका ओढ्यातून पोहत पोहत एका दलदलीच्या जागी जाऊन पोहोचले. तेथे त्यांना चांगले खाद्य मिळू लागले म्हणून त्यांनी तेथे कायम राहावयाचे ठरविले. जवळच्या रानटी हंसाचा एक कळप वरचेवर तेथे येऊन बसत असे. त्या कळपातील हंसांना या गावठी हंसांशी मैत्री करण्यास पाहिल्याने संकोच वाटला. पण कालांतराने त्यांचा इतका परिचय झाला की, ते त्यांच्याशी अगदी मोकळेपणाने वागू लागले.
एके दिवशी त्या हंसाचे आवाज ऐकून एक कोल्हा लपत छपत तेथे आला व तो त्यांच्यावर झडप घालणार तोच त्याची चाहूल ऐकून सगळे रानटी हंस ओरडत आकाशात उडून गेले.
ते दोघे गावठी हंस मात्र तेथेच राहिले. गावात असताना त्यांचा मालक त्यांचे रक्षण करीत असे. त्यामुळे त्यांना उडण्याची किंवा स्वतःचे रक्षण करण्याची सवय नव्हती. त्यामुळे ते दोघेही त्या कोल्ह्याच्या भक्ष्यस्थानी पडले.

**तात्पर्य:** जेथे आपले रक्षण करण्यास आपण समर्थ नाही तेथे जाउन राहणे मूर्खपणा होय.